महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता

मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक -१ पुणे -१

अर्सेनल प्लॉट नं.२३१ कंपाऊड दुसरा

मजला सागर प्लाझा

हॉटेल समोर कॅप्म पुणे -४११००१

दुरध्वनी क्रमांक ०२०-२६६३३३०५७

email address:rppune.ee@mahapwd.com

# नागरिकांची सनद

| अनुक्रमांक | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावाना | १ |
| २ | नागरिकाची रचना | २ |
| ३ | कार्यालयाची रचना | २ |
| ४ | गा-हाणी /तक्रारी यांचे निराकरण | ३ |
| ५ | नागरिकांच्य सनदेची अंमलबजावणी | ३ |
| ६ | नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी | ४ |
| ७ | माहिती अधिकार अधिनियम -२००५प्रकरणे | ४ |
| ८ | उपविभागीय कार्यालयाची माहिती | ५ |
| ९ | वृक्ष तक्ता | ६ |

## प्रस्तावाना :-

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुमारे १५० वर्षाची गौरवशाली पंरपरा आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातंर्गत मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक १ पुणे अर्सेनल प्लॉट नं.२३१ कंपाऊड दुसरा मजला सागर प्लाझा हॉटेल समोर कॅम्प पुणे -४११००१ या ठिकाणी सुमारे मा अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ पुणे ---- वर्षापासून कार्यरत आहें.

हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. ही बांधिलकी मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक -१ पुणे या सनदेव्दारे जाहीर करीत असून ती स्विकारीत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक /व सन्मानपूर्वेक वागणूक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकाचे सामाईक प्रश्न सहानुभुतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन ही सनद तयार करतांना नजरेसमोर ठेवला आहे. याकार्यालयाकडून प्रामुख्याने खालील प्रमाणे कामे करण्यात येईल.

१. या कार्यालयामार्फत शासकीय इमारतीची (कार्यालयीन तसेच निवासी गाळे ) नवीन बांधकामे सव्हेक्षण करुन अंदाजपत्रक तयार केली जातात

२. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार रस्त्यांची नविन बांधकामे सुधारणा तसेच त्यावरील मोठे पूल यांचे सविस्तर सर्वेक्षण करुन अदांजपत्रक तयार करणे व संकल्प चित्र मंडळाकडून मंजूरी घेतली जाते.

३. आपत्कालीन व्यवस्थेसाठी तात्परतेने स्थापत्य अभियांत्रिकी संबधित आवश्यक ती कामे करणे व मदत करणे

४. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत मागविलेली माहिती संबधिताना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे

५. विभागाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून विभागाची लोकभिमुखता वाढविणे

६. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे

७. संगणकी करणाबाबत सर्व मंडळ कार्यालये प्रादेशिक कार्यालये तसेच मंत्रालय यांचेशी नेटवर्कने जोडून आवश्यक माहिती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे. विभगाची विविध माहिती (WWW.MAHAPWD.COM) या बेबसाईटवर अदयावत उपलब्ध करणे.

१०. **बांधीलकी:-** वरील सर्व कर्तव्य पार पाडताना मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक -१पुणे हे सेवेच्या गुणवतेची बांधिलकी ठेवेल

अ) सौजन्य पुर्ण व मदतीची वृत्ती ठेवून कामाच्या वेळेत निपटारा करेल

ब) पारदर्शकता व निष्ठा ठेवील

**२. <u>नागरिकाची जबाबदारी</u> :-**

शासकीय अधिकारी -कर्मचारी यांचेशी नागरिकाची वर्तणुक सौजन्यपूर्वक असावी

नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावीत

नागरिकांची प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा

विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्यातचा आग्रह धरु नये

सार्वजनिक मालमतेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे

रस्त्यांच्या दोन्ही बाजूना असणा-या वृक्षाराजीचे जतन ही नागरिकाची जबाबदारी राहील

नागरिकांनी कायदेशीर तरतुदी नियम अलिखित संकेत यांचे पालन करावे

**<u>कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक -१ पुणे या कार्यालयाची रचना</u>**

कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग क्रमाकं -१ पुणे-१ या कार्यालयाचे अधिपत्याखाली एकुण पाच उपविभाग आहे विभागीय कार्यालयातील क्षेत्रिय कामे या उप विभागाकडूनन पार पाडली जातात कार्यकारी अभियंता हे विभागीय कार्यालयाचे प्रमुख आहेत तर उप अभियंता हे उपविभागाकडून कामाची अंमलबजावणी करतात

विभागीय कार्यालयात प्रकल्प शाखा/ रेखा शाखा/ लेखा शाखा /भांडार शाखा /आस्थापना शाखा अशी शाखावर विभागणी केली आहे. विभागीय कार्यालयाचा वृक्ष तक्ता सोबतचे **परिशिष्ठ ब** मध्ये दर्शविला आहे.

या शाखांचे प्रमुख अधिकारी / कर्मचारी खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | शाखा | प्रमुख अधिकारी | अधिकारी /कर्मचारी |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प शाखा | उप कार्यकारी अभियंता, | शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / कनिष्ठ अभियंता (प्रकल्प अभियंता) |
| २ | रेखा शाखा | आरेखक | सहाय्यक आरेखक / अनुरेखक |
| ३ | लेखा शाखा | विभागीय लेखाधिकारी | वरिष्ठ लिपीक /कनिष्ठ लिपीक |
| ४ | आस्थापना शाखा | प्रथम लिपीक | वरिष्ठ लिपीक /कनिष्ठ लिपीक |
| ५ | भांडार शाखा | भांडारपाल | सहाय्यक भांडारपाल /कनिष्ठ लिपीक |

कार्यकारी अभियंता यांचे कार्यक्षेत्र सर्वसाधारणपणे पुणे जिल्हा आहे. या विभागामार्फत पुणे जिल्हयातील तसेच आवश्यक असल्यास वरिष्ठ कार्यालयास आदेशानुसार इतर जिल्हयातील नवीन रस्त्याचे सर्वेक्षण अंदाजपत्रके तसेच नवीन पूल बांधणे यासाठी  लागणारी सर्व प्राथमिक अंदाजपत्रके तयार करणे तसेच या दोन्ही जिल्हामध्ये नवीन इमारती बांधकामाचे प्राथामिक अंदाजपत्रके तयार करणे इत्यादी कामे केली जातात. ही सर्व कामे उपविभागीय अभियंता हे शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांचे मार्फत करुन घेतात व ते विभागीय कार्यालयास अहवाल सादर करतात.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक -१ पुणे पुरवित असतो कामांच्या अंमलबजावणीसाठी सार्वजनिक बांधकाम नियमावली लेखा सहिंता विनिर्देश वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-यांकडून केले जाते

## (अ.) **माहितीची सुलभता**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावरुन (WWW.MAHAPWD.COM) तसेच वेळीवेळी प्रसिध्द केले जाणा-या पत्रकाव्दारे जनतेला आकडे वारीचा तपशिल सुलभतेने उपलबध होईल मुखत्वेकरुन या संकेतस्थळावर निविदासुचना परिपत्रके या कार्यालयाची माहिती दिली आहे.

या विभागाअंतर्गत कामाबाबंत नागरिकांनी काही गा-हाणी अथवा तक्रारी असतील तर विभागीय प्रथम लिपीक यांचेकडे लेखी निवेदन प्राप्त झाल्यानंतर लवकरात लवकर त्यांचे निराकरण करण्यात येते

## जनसामान्याकडून सुचना

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनाच्या गांभिर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळीवेळी सुधारणा घडवून आणता येईल ही नागरिकांची सनद स्वत:हुन काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही ती ग्राहकाना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना हक्क मांडण्यासाठी मदत करते

## नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

मार्ग प्रकल्प विभागाच्या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास हा विभाग कटीबध्द आहे. मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक १ पुणे १ हे कार्यालय खात्रीपूर्वक गुणवतेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवदेनाशील सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल कार्यपध्दती अधिक लोकभिमुख सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल तसेच नागरिकाच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

## माहिती अधिकार अधिनियम -२००५ प्रकरणे

अ) माहिती अधिकारात आलेले अर्ज हे विभागीय कार्यालयाशी संबधित माहिती असेल तर संबधित कर्मचा-यांकडील माहिती एकत्रित करुन अर्जदारास ३० दिवसाचे आज माहिती बाबत शुल्क भरण्यास कळविले जाते अथवा जाते.

ब) माहिती आधिकारात आलेले अर्ज हे ब-याच वेळेस इतर प्राधिकरणाशी संबधित असल्यास माहिती अधिकार अधिनियमात -२००५ अंतर्गत कलम (३) खाली ५ दिवसाचे आत वर्ग करणेत येतो

क) माहिती अधिकारात आलेले अपील अर्जावर अपील सुनावणी ही तीस दिवसाचे आत घेवून निर्णय दिला जातो रेखा शाखेतील संबधित कामाच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ठ क मध्ये नमुद केले आहे.

**कार्यकारी अभियंता,मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक -१ पुणे-१**

**यांचे अधिपत्याखालील उपविभागाची माहिती उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाची माहिती**

| अ.क्र | कार्यालाचे नाव | पत्ता /दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | उप अभियंता मार्ग प्रकल्प उपविभाग क्रमाक २ पुणे | अर्सेनल प्लॉट नं.२३१ कंपाऊड दुसरा मजला सागर प्लाझा हॉटेल समोर कॅप्म पुणे -४११००१ दुरध्वनी क्रमांक ०२०-२६६३३३०५७ |
| २ | उप अभियंता मार्ग प्रकल्प उपविभाग क्रमाक ६ पुणे | अर्सेनल प्लॉट नं.२३१ कंपाऊड दुसरा मजला सागर प्लाझा हॉटेल समोर कॅप्म पुणे -४११००१ दुरध्वनी क्रमांक ०२०-२६६३३३०५७ |
| ३ | उप अभियंता मार्ग प्रकल्प उपविभाग क्रमाक ७ पुणे | अर्सेनल प्लॉट नं.२३१ कंपाऊड दुसरा मजला सागर प्लाझा हॉटेल समोर कॅप्म पुणे -४११००१ दुरध्वनी क्रमांक ०२०-२६६३३३०५७ |
| ४ | उपविभागीय अभियंता इमारत प्रकल्प सर्वेक्षण उपविभाग पुणे | अर्सेनल प्लॉट नं.२३१ कंपाऊड दुसरा मजला सागर प्लाझा हॉटेल समोर कॅप्म पुणे -४११००१ दुरध्वनी क्रमांक ०२०-२६६३३३०५७ |
| ५ | उपविभागीय अभियंता पूल टेहळणी सर्वेक्षण उपविभाग पुणे | अर्सेनल प्लॉट नं.२३१ कंपाऊड दुसरा मजला सागर प्लाझा हॉटेल समोर कॅप्म पुणे -४११००१ दुरध्वनी क्रमांक ०२०-२६६३३३०५७ |

## कार्यकारी अभियंता

### परिशिष्ठ -ब
### वृक्ष तक्ता

